**कृपया प्रसिध्दिसाठी** **24 फेब्रुवारी, 2010**

## भाडेवाढ नाही हे स्वागतार्ह; पण एमयुटीपीचे काय? : राम नाईक

**मुंबई, बुधवार :** "रेल्वे मंत्री कु. ममता बॅनर्जी यांनी भाडेवाढ केली नाही हे स्वागतार्ह आहे. मात्र त्याचवेळी गेली सहा वर्षे उपेक्षित असलेल्या मुंबईकर उपनगरी रेल्वे प्रवाशांना रेंगाळलेल्या एमयुटीपी I व II च्या योजना कधी पूर्ण होतील याबाबत त्यांनी काहीही माहिती न दिल्याने आपल्या समस्यांची तड लागणार नाही असेच वाटत आहे," अशी प्रतिक्रिया माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांनी रेल्वे बजेट नंतर व्यक्त केली आहे.

"प्रवाशांची वाढती संख्या व लालफितीत रेंगाळलेले प्रकल्प यामुळे 101 नव्या गाड्या घोषित करुनही मुंबईकरांना तो पुरेसा दिलासा नाही. त्यातून या गाड्या नऊ डब्यांच्या की बारा डब्यांच्या याबद्दलही स्पष्ट भूमिका रेल्वे मंत्र्यांनी घेतलेली नाही. अजून धावत असलेल्या नऊ डब्यांच्या गाड्या बारा डब्यांच्या कधी होणार हेही रेल्वे मंत्र्यांनी सांगायला हवे होते. मात्र हमाल आणि फेरीवाले आदी असंगठीत क्षेत्रातील कामगारांना विमा संरक्षण देण्यांची वाजपेयी सरकारची भूमिका निदान रेल्वे मंत्रालयापुरती लागू होत आहे. याचे मला समाधान वाटते," असेही श्री. नाईक म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**